REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम 2009 आणि मूल्यमापन

मंजू यादव
संशोधक विद्यार्थी



1 एप्रिल 2010 पासून संपूर्ण देशभर (जम्मू काश्मिर) वगळता बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम 2009 लागू झाला आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियमावली 11 ऑक्टोबर 2011 पासून राज्यात लागू करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या नेमक्या भूमिका काय असतील त्यांनी शाळेमध्ये नेमकी कोणती कार्य पार पाडावीत हे निश्चित केलेले आहे.

या कायद्यामध्ये पुढील तरतुदीबाबत विचार केलेला आहे किंवा प्रत्येकांची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या कायदयान्वये बालकाला शाळा प्रवेश देताना शुल्क आकारण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. देणगी शुल्क आकारणाऱ्या शाळांवर 10 पट दंडाची तरतूद केलेली आहे. या अधिनियमानुसार 6 वर्ष वय पूर्ण झालेल्या कोणत्याही बालकास किमान प्राथमिक शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. तो हक्क शिक्षक, शाळा, शासन , शैक्षणिक प्रशासन , माता / पिता / पालक कोणीही हिरावून घेवू शकत नाही. तसेच वयाच्या 14 वर्षापर्यत त्याला मोफत शिक्षणाच्या प्रवाहात पाठविण्याची जबाबदारी शाळा, शिक्षक शासन, शैक्षणिक प्रशासन, इ. सर्वांवर ठेवली आहे. इयत्ता 1 ली ते 8 वी तील अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याबाबत व त्याच्या संपादणूक पातळीत वाढ करण्याबाबत या अधिनियमात सूचना दिलेल्या आहेत. या अधिनियमात बालकाला त्याच्या घरापासून जवळच साधरणत: 3 किमी. च्या आत शाळा उपलब्ध करून देण्याची तरतूद केलेली आहे. सन 2010-11 या शैक्षणिक वर्षापासून मूल्यमापनात बदल करून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रिया लागू केली आहे. या प्रक्रियेद्वारे बालकांच्या वेगवेगळ्या वर्तनाचे त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या वेगवेगळ्या पैलूचे विविध अंगाने मूल्यमापन करण्याची प्रक्रिया लागू केली आहे.

समाज शाळाभिमुख, शाळा शिक्षकाभिमुख, शिक्षण, विद्यार्थीपरायण , विद्यार्थी ज्ञानपरायण आणि विद्यार्थ्यांचे ज्ञान समाजासाठी सेवापरायण , हे खऱ्या अर्थाने झाले तरच शाळेने गुणवत्ता विकासासाठी पराकाष्ठा केली असे म्हणता येईल. विद्यार्थी स्वतंत्र ज्ञानोपासक बनण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची जडणघडण करणे यावर शिक्षण पद्धतीचा मुख्य भर असला पाहिजे.

जेव्हा अध्ययन उद्देशपूर्ण असते तेव्हा सर्जनशीलता बहरते
जेव्हा सर्जनशीलता बहरते तेव्हा विचार उत्पन्न होतात
जेव्हा विचार उत्पन्न होतात तेव्हा ज्ञान पूर्णत: प्रकाशित होते.
जेव्हा ज्ञान प्रकाशित होते तेव्हा अर्थव्यवस्थेची भरभराट होते

- डॉ. ए. पी .जे. अब्दुल कलाम.

मुलांना वाचायला-लिहायला तर यावेच पण त्याच बरोबर त्यांना उत्तम बोलायला यावे, चांगले खेळायला यावे. त्यांनी सभोवतालच्या परिसरातील घटनांचे आणि वस्तूंचे निरीक्षण करून ज्ञान मिळवावे. हाताने विविध कामे करावीत, कलाकौशल्य शिकावित. विविध कलांचा आस्वाद घेण्यास शिकावे. त्यांचे व्यक्तिमत्व अनेकविध अंगानी बहरावे अशी अपेक्षा आहे. मुलांनी शिकता-शिकता आणि कृती करता-करता स्वत:चा शोध घेण्यास सुरूवात करावी. या शोधातून त्यांना स्वत:मधील निसर्गदत्त शक्तिस्थळे गवसावित आणि मग प्रत्येक मुलाने आवडीच्या क्षेत्रात उत्तुंग झेप घ्यावी अशा हेतूने मूल्यमापन पध्दती लागू केली आहे.

भारत सरकारने बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम 2009 ची अंमलबजावणी करताना कलम 29(2) नुसार मूल्यमापनात बदल केला आहे. त्या अपेक्षांची परिपूर्ती करताना गेले दोन वर्षापासून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रियेत बदल घडवून आणला. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती संपूर्ण राज्यात सुरू केली. सातत्यूपण्र सर्वकष मूल्यमापनात आकारिक मूल्यमापनासाठी विविध तंत्राचा समावेश केला. त्यामुळे मूल्यमापन ताणतणावविरहित व आनंददायी बनेल या हेतूने या पद्धतींचा अवलंब करण्यात आला.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विविध अंगानी विकसित होत असताना निरीक्षणातून विद्यार्थ्यांचे शिकण्यासाठी धडपडणे , बोलणे , विचार व्यक्त करणे , त्याचे लिहिणे, त्याने दाखवलेले कल्पनाचातुर्य त्याचे चिकित्सक तसेच सर्जनशील विचार करणे या सर्व बाबींचा पडताळा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीने घेता येतो. शिक्षकांनी दैनंदिन अध्ययन अध्यापनात अध्ययन अनुभव देत असताना आकारिक मूल्यमापन नकळत घडते. मूल्यांची रूजवणूक व जीवन कौशल्यांचा विकासही सहज साधता यावा या हेतूने सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीत आकारिक मूल्यमापनाचा समावेश करण्यात आला.

प्राथमिक शिक्षणामधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शारीरिक, बौध्दिक व भावनिक अशा स्तरावरील क्षमता आणि कौशल्य यांचा विकास अपेक्षित असतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असताना मूल्यमापनातून वेळोवेळी त्यांच्या अध्ययनातील त्रुटी अडचणी वेळच्यावेळी दूर होऊन त्यांची उत्तम शैक्षणिक प्रगती व्हावी अशी अपेक्षा असते. संपादक (2010): म.रा.शै.सं व प्र.परिषद (विद्या परिषद), पुणे : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (शिक्षक मार्गदर्शिका) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये देखील स्मरणावर भर देणाऱ्या परीक्षेऐवजी नाविन्यपूर्ण मूल्यमापन प्रक्रियेचा अवलंब करण्यावर विशेष भर दिला आहे व त्यामध्ये तोंडी काम , गट कार्य , आकारिक मूल्यमापन, छोटे-छोटे प्रकल्प इत्यादी पर्याय सुचविले आहेत. तेंव्हापासून खऱ्या अर्थाने मूल्यमापन पध्दतीमधील बदलाच्या प्रयत्नांना दिशा मिळाली व दिनांक 31 ऑगस्ट 2004 च्या शासन निर्णयाच्या माध्यमातून लेखी परीक्षेबरोबर तोंडी, प्रात्यक्षिक, स्वाध्याय, गृहपाठ आणि प्रकल्प या साधनांना मूल्यमापनात स्थान दिले. त्यासंदर्भात शिक्षकांना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून एन.सी.ई.आर.टी नवी दिल्ली या संस्थेने 1 ली ते 5 वी पर्यंतच्या स्त्रोतपुस्तिका तयार केल्या आहेत. परीषदेने सन 2009-10 यावर्षी स्त्रोतपुस्तिका वापराबाबतचा पथदर्शी प्रकल्प 8 विभागातील एकूण 100 शाळांमध्ये कार्यान्वित केला. या प्रकल्पातील सहभागी शिक्षकांनी संपूर्ण प्रक्रियेत सकारात्मक बदल होत असल्याचे उत्स्फूर्तपणे नमूद केले. स्त्रोतपुस्तिकेतील तत्त्वांचा व वरील प्रेरणेचा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्य पध्दतीसंबंधीचा दिनांक 20 ऑगस्ट 2010 चा शासन निर्णय तयार करताना मदत झाली.

6 ते 14 वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम केंद्र शासनाने पारीत करुन भारत सरकारच्या दि. 27/08/2009 च्या राजपत्रात प्रसिध्द केला. त्यानुसार सर्व बालकांना शिक्षण प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यासाठी ज्ञानसंरचनावादाची संकल्पना समोर आली व विद्यार्थ्यांना ज्ञानसंरचना करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. दि. 20 आगॅस्ट2010 साली सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी करत असताना आजपर्यंत तीन टप्प्यात या पध्दतीच्या अंमलबजावणी संदर्भात शिक्षकांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आले आहे. परंतु या पध्दतीच्या अंमलबजावणी संदर्भात शिक्षकांमध्ये संभ्रम किंवा अडचणी दिसून येतात. उदा - पहिल्या टप्प्यामध्ये दैनंदिन निरीक्षणासाठी 5 गुण देण्यात आले होते. त्या संदर्भात अनेक शंका उपस्थित झाल्यानंतर त्याला देण्यात येणारे गुणांकन रद्द करण्यात आले व ते शिक्षकांना प्रशिक्षणामध्ये सांगण्यात आले. त्यामुळे देखील संभ्रम निर्माण झाला असे होणारे बदल शिक्षकांपर्यंत योग्य पध्दतीने पोहचतात की नाही, या योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे केली जाते याचा पडताळा घेण्याच्या दृष्टीकोनातून संशोधकाने संबंधित विषयाची निवड केली.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीची अंमलबजावणी करण्यासाठी परिषदेच्या वतीने प्रथमत: सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन मार्गदर्शिका भाग 1 विकसित करुन त्यामध्ये शासननिर्णय सविस्तर स्पष्ट करण्यात आला होता. प्रशिक्षणाच्या

माध्यमातून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीची संकल्पना स्पष्ट करुन मार्गदर्शन केले गेले. या प्रशिक्षणांनंतर विभागीय पातळीवरील बैठकातून तसेच प्रश्नावलीच्या मदतीने अंमजबजावणीतील अडचणींचा आढावा घेण्यात आला. तेंव्हा शिक्षकांना नोंदीसंबंधी अडचणी आहेत ही बाब निदर्शनास आली. तेव्हा त्या सोडविण्याच्या दृष्टीकोनातून शिक्षक मार्गदर्शिका भाग 2 तयार करण्यात येवून त्या आधारे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणानंतरही अंमलबजावणी संबंधात मागोवा घेण्यात आला. तेंव्हा अध्ययन अध्यापनात मूल्यमापनाच्या साधन तंत्राचा समावेश कसा करावा याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनाची गरज असल्याची बाब समोर आली व शिक्षक मार्गदर्शिका भाग 3 तयार करुन त्यानुसार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये अध्ययन - अध्यापनात व मूल्यमापनाचा सहसंबंध कसा साधावा, विद्यार्थी संचयी कशा तयार कराव्यात, संचयी नोंदपत्रक कसे तयार करावे. त्यामध्ये नोंदी कशा कराव्यात याबाबत मार्गदर्शन करण्यात आले पंरतु अजूनही शिक्षकांना संचयी नोंदपत्रकातील नांेदी ठेवताना अडचणी वाटतात. त्या सोडविणे गरजेचे आहे.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन संदर्भात तसेच मूल्यमापनासंदर्भात राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF2010) मध्ये निर्देशित केलेल्या बाबी पुढीलप्रमाणे- मूल्यमापनासाठी दर्शक निश्चित करावेत, ज्ञानरचनावादाला प्रोत्साहन, समस्यापूर्ती, स्व-ची जाणीव, बहुदिशा विचार, सर्वांगीण विकास हे मुद्दे विचारात घेण्यास सांगितले आहेत. तसेच गुणांऐवजी श्रेणीचा वापर, वैशिष्ट्यपूर्ण गुणांची नोंद प्रकल्प, उपक्रम, सहशालेय उपक्रम, स्वाध्याय, व्यक्तिगत छंद याची जपणुक बुध्दीमत्तेच्या पैलूस व कृतीस वाव देणाऱ्या लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक प्रश्नांचा समावेश असावा असा निर्देश करण्यात आला आहे. त्याचबरोबर N.C.E.R.T ने या संदर्भात स्त्रोतपुस्तिका विकसित करुन त्यामध्येही वर्गात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरु असताना विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे, स्वंयमूल्यमापन, गटकार्य सुरु असताना होणारे मूल्यमापन, सध्याची मूल्यमापन निरीक्षणे व नोंदी यांचा मूल्यमापनासाठी वापर करावा असे निर्देशित केले आहे. संपादक (2010): म.रा.शै.सं व प्र.परिषद (विद्या परिषद), पुणे : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (शिक्षक मार्गदर्शिका)

## संदर्भग्रंथ सूची


1) www.maharashtra.gov.in
2) www.shodhgangotri.com
3) संपादक . म.रा.शै.सं. व प्र. परिषद, (2010) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका भाग 1-4, पुणे : विदया परिषद
4) संपादक (2010): म.रा.शै.सं व प्र.परिषद. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (शिक्षक मार्गदर्शिका) पुणे :